महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

w'site : www.dydepune.com
e-mail: 11thonlineadmissiondydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

## पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०२०-२१

---

### प्रसिध्दी निवेदन-०१/२०२०
### दि.०१.०७.२०२०

इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाचे कामकाज पुणे, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०१.२०१७, दि.०७.०३.२०१९ व दि.२३.०६.२०२० अन्वये सुरु करण्यात आलेले आहे. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी इ.११ वी प्रवेश प्रक्रियेचे संकेतस्थळ **https://pune.11thadmission.org.in/** आहे.

सन २०२०-२१ साठीच्या इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेंतर्गत कनिष्ठ महाविद्यालयांची नोंदणी व विद्यार्थी पालकांसाठी अर्जाबाबत संभाव्य वेळापत्रक व सूचना खालील प्रमाणे आहेत.

| क्र. | कार्यवाहीचे टप्पे | कालावधी | संबधित स्तर |
|---|---|---|---|
| १ | उच्च माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालयांची संकेतस्थळावर नोंदणी | दि.०२.०७.२०२० पासून दि.१५.०७.२०२० पर्यंत | मुख्याध्यापक/प्राचार्य, शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये |
| २ | उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी नोंदविलेली माहिती तपासणी करुन ऑनलाईन अंतिम करणे. | दि.०२.०७.२०२० पासून ते १६.०७.२०२० पर्यंत | विभागीय शिक्षण उपसंचालक |
| ३ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करणे, प्रवेश अर्ज भाग-१ भरणे, व माहिती अॅप्रुव्ह करणेसाठी शाळा/मार्गदर्शन केंद्र निवडणे आणि अर्ज अॅप्रुव्ह झाला आहे याची खात्री करणे. | दि.१५.०७.२०२० पासून महाराष्ट्र राज्य मंडळाची इ.१० वी परीक्षेचा निकाल जाहीर होईपर्यंत | विद्यार्थी स्वतः पालकांच्या मदतीने |
| ४ | विद्यार्थी प्रवेश अर्जातील माहिती भाग-१ ऑनलाईन तपासून अॅप्रुव्ह करणे आवश्यकता असल्यास विद्यार्थ्यांशी दुरध्वनीवरुन संपर्क साधणे. | दि.१६.०७.२०२० पासून महाराष्ट्र राज्य मंडळाची इ.१० वी परीक्षेचा निकाल जाहीर होईपर्यंत | संबधित मार्गदर्शन केंद्र/शाळा/ महाविद्यालये |
| ५ | विद्यार्थ्यांनी भाग-२ (पसंतीक्रम) नोंदविणे व सबमिट करणे (भाग-१ सह) | इ.१०वी परीक्षेचा ऑनलाईन निकाल जाहीर झालेपासून सुरु | विद्यार्थी स्वतः पालकांचे मदतीने |

यापुढील प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक यथावकाश जाहीर केले जाईल.

**मुख्याध्यापक/विद्यार्थी पालक यांच्यासाठी सूचना :-**

१) विहित (पुणे व पिंपरी चिंचवड) महानगरपालिका क्षेत्रातील इ.११ वी चे सर्व प्रवेश ऑनलाईन पध्दतीने होतील व सदर क्षेत्रातील सर्व मान्यता प्राप्त उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये यामध्ये सहभागी



Scanned with CamScanner

होतील, याची दक्षता घ्यावी. सदर क्षेत्रामध्ये इ.११ वी चे प्रवेश ऑफलाईन पध्दतीने दिल्यास ते अमान्य ठरतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

२) सदर प्रक्रियेबाबत पुरेशा प्रमाणात प्रचार व प्रसार विद्यार्थी, पालक यांचेपर्यंत माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांनी करावा.

३) संदर्भिय शासन निर्णयान्वये केलेल्या सुधारणांबाबत संबधितास अवगत करण्यात यावे. आरक्षणाबाबत सुधारित तरतुदी (एसईबीसी-१२ टक्के व दिव्यांग-०४ टक्के) तसेच कोटानिहाय आरक्षण, इनहाऊस कोटा-१० टक्के, व्यवस्थापन कोटा-०५ टक्के, अल्पसंख्यांक शाळांमध्ये कोटा-५० टक्के) याबाबत आवश्यक जागृती करावी.

४) दि.२३.०६.२०२० चे शासन निर्णयातील तरतुदीनुसार पुणे व पिंपरी चिंचवड मनपा शाळांसाठी इनहाऊस विशेष कोटा जागांमध्ये वाढ हवी असल्यास संबधित उमावि/कमविंचे, तपशील व कारणांसह प्रस्ताव संचालनालयास त्वरीत सादर करावा.

५) ऑनलाईन प्रवेश क्षेत्रामध्ये प्रवेश घेण्यासाठी (कोणत्याही कोटयातुन) प्रत्येक विद्यार्थ्यांस केंद्रीय प्रवेश प्रक्रियेचे संकेतस्थळावर ऑनलाईन रजिस्ट्रेशन / नोंदणी करणे आवश्यक आहे.

**६) सद्यस्थितीत कोरोना विषाणू प्रादुर्भावामुळे निर्माण झालेली परिस्थिती व त्यानुषंगाने सर्व नियम पाळणे आवश्यक आहे.**

७) शाळा / महाविद्यालयांची नोंदणी सुरु झालेनंतर त्यासाठी गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी. करीता शाळांना आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याची सुविधा देण्यात येत आहे. त्यानुसार ऑनलाईनच कागदपत्रे तपासून या कार्यालयाच्या स्तरावर रजिस्ट्रेशन अ‍ॅप्रुव्ह केले जाईल. कोणासही समक्ष बोलाविले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

८) सन २०२०-२१ मध्ये माहिती पुस्तिका छापील स्वरुपात दिली जाणार नसलेमुळे ऑनलाईन नोंदणी करतानाच विद्यार्थ्यांना लॉगीन आयडी व पासवर्ड प्राप्त होईल आणि माहिती पुस्तिकेची प्रत संकेतस्थळावर व मोबाईल अ‍ॅप मध्ये उपलब्ध असेल.

९) विद्यार्थ्यांची माहिती अ‍ॅप्रुव्ह करणे व त्यांना सहाय्य करणेसाठी आवश्यकते नुसार मार्गदर्शन केंद्रांची स्थापना करण्यात आलेली आहे, त्याची माहिती इ.११ वी ऑनलाईन माहिती पुस्तिकेत उपलब्ध आहे. शाळास्तरावरुन अर्ज अ‍ॅप्रुव्ह करण्याची कार्यवाही सुध्दा ऑनलाईनच करावयाची आहे. विद्यार्थ्यांना त्यासाठी शाळेत/मार्गदर्शन केंद्रावर जावे लागू नये याची दक्षता शाळा व मार्गदर्शन केंद्रानी घ्यावी.

१०) प्रवेश प्रक्रिया शुल्क जमा करणेसाठी केवळ ऑनलाईन सुविधा उपलब्ध असणार आहे. रोख रक्कम जमा करता येणार नाही. तरी ऑनलाईन शुल्क जमा करणेच्या विविध पध्दती विद्यार्थी व पालकांना समजावून सांगणेसाठी / जागृती करणेसाठी शाळा महाविद्यालयांनी पुरेसे प्रशिक्षण देण्यात यावे. (उद्‌बोधन/प्रशिक्षण देणेसाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा, सामाजिक अंतर पाळावे).



Scanned with CamScanner

११) विद्यार्थ्यांनी इ.११ वी ऑनलाईन प्रवेश अर्जाचा (भाग-२) (ऑप्शन फॉर्म/पसंतीक्रम ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इ.१०वी च्या ऑनलाईन निकालानंतर भरावयाचा आहे.

१२) तत्पुर्वी विद्यार्थ्यांनी भाग-१ भरुन अॅप्रुव्ह करुन देण्याची जबाबदारी संबधित माध्यमिक शाळेची राहील, तसेच पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका ऑनलाईन क्षेत्राबाहेरील व राज्यमंडळा व्यतिरिक्त इतर विद्यार्थ्यांच्या इ.११ वी ऑनलाईन प्रवेश अर्जाचा (भाग-१) अॅप्रुव्ह करण्याची जबाबदारी मार्गदर्शन केंद्राची राहील.

१३) मुख्याध्यापक व तंत्र सहाय्यक यांचे प्रशिक्षण, पालक व विद्यार्थ्यांसाठी उद्‌बोधन वर्ग घेण्यात येतील, त्याचे वेळापत्रक वेळोवेळी जाहीर केले जाईल.

१४) कोविड-१९ प्रादुर्भाव रोखणेसाठी सर्व निकष पाळुन प्रवेश प्रक्रिया कमीत-कमी वेळेत पूर्ण होणेसाठी सर्व घटकांनी सहाय्य करावे.

प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य (First Come First Serve) ही फेरी होणार नाही, याची विद्यार्थ्यांना जाणीव करुन द्यावी. **दक्षता घ्या, सुरक्षित राहा.**

सदरचे प्रसिध्दीनिवदेन या कार्यालयाच्या www.dydepune.com व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या https://pune.11thadmission.org.in/ संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(मीना शेंडकर)
सचिव,
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
सहा.शिक्षण संचालक,
पुणे विभाग पुणे-१



Scanned with CamScanner